# १ जानेवारी, २०१७ ते ३१ मे, २०१७ या कालावधीत
# मंडळाच्या कामाचा कार्यअहवाल

* नवलेखक अनुदान योजना -
या योजनेअंतर्गत सन २०१७ साठी नवलेखकांकडून त्यांचे साहित्य दि. ०१ जानेवारी, २०१७ ते दि.३१जानेवारी,२०१७ या कालावधीत मागविण्यात आले आहेत.

* स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना -
या योजनेअंतर्गत सन २०१६ च्या राज्य वाङ्मय पुरस्कार स्पर्धेसाठी दि. १ जानेवारी, २०१७ ते दि. ३१ जानेवारी, २०१७ या कालावधीत लेखक व प्रकाशक यांजकडून प्रवेशिका व पुस्तके मागविण्यात आली आहेत.

* मराठी भाषा गौरव दिन समारंभ -
शासनाच्यावतीने दि. २७ फेब्रुवारी, २०१७ रोजी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात विंदा करंदीकर जीवनगौरव पुरस्कार, श्री. पु. भागवत पुरस्कार व स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार २०१५ इत्यादी पुरस्कार मा.मंत्री महोदय, मराठी भाषा यांच्या उपस्थितीत व मान्यवर साहित्यिकांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.

* राज्य वाङ्मय पुरस्कार प्रदान -
मंडळाच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार या योजनेअंतर्गत सन २०१५ चे राज्य वाङ्मय पुरस्कार ३३ साहित्यिकांना दि.२७ फेब्रुवारी, २०१७ रोजी मराठी भाषा गौरव दिनी मा.मंत्री महोदय, मराठी भाषा यांच्या उपस्थितीत व मान्यवर साहित्यिकांच्या हस्ते प्रदान करण्यात आले.
(मराठी भाषा विभाग शासन निर्णय क्र. - रावापु-२०१६/प्र.क्र.१६८/२०१६/भाषा -३,दि. २६ ऑक्टोंबर, २०१६)

* विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार -
मंडळाच्यावतीने सन २०१६ चा विंदा करंदीकर जीवन गौरव पुरस्कार दि.२७ फेब्रुवारी, २०१७ रोजी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ज्येष्ठ साहित्यिक श्री. मारुती चितमपल्ली यांना मा.मंत्री महोदय, मराठी भाषा यांच्या उपस्थितीत व मान्यवर साहित्यिकांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे स्वरुप रु.५ लक्ष रोख, मानचिन्ह व मानपत्र असे आहे.

* श्री. पु. भागवत पुरस्कार -
मंडळाच्यावतीने सन २०१६ चा श्री. पु. भागवत पुरस्कार दि. २७ फेब्रुवारी, २०१७ रोजी मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात भारतीय विचार साधना, पुणे या प्रकाशन संस्थेस मा.मंत्री महोदय, मराठी भाषा यांच्या उपस्थितीत व मान्यवर साहित्यिकांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. या पुरस्काराचे स्वरुप रु. ३ लक्ष रोख, मानचिन्ह व मानपत्र असे आहे.

* पुस्तक प्रकाशन योजना -
या योजनेअंतर्गत मंडळाच्यावतीने १) आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास खंड पहिला २) महाराष्ट्राचे शिल्पकार महर्षी धोंडो केशव कर्वे ३) महाराष्ट्राचे शिल्पकार झाशीची राणी लक्ष्मीबाई ४) श्री चांगदेव पासष्टी (अर्थ व विवरणा सहित) ५) श्रीमत् भगवद् पूज्यपाद आद्य शंकराचार्य कृत अपरोक्षानुभूति (अर्थ व विवरणा सहित)

६) महाराष्ट्राचे शिल्पकार कृष्णराव पांडुरंग भालेकर ७) भरतमुनिविरचितं नाट्यशास्त्रम् खंड - पहिला अध्याय १ ते १२ (मराठी अनुवाद पदच्छेद आणि अन्वयासह) ८) आधुनिक संत आणि समाज ९) लक्ष्मीबाई टिळक १०) माताजी (पुनर्मुद्रण) ११) प्रबोधनकार ठाकरे समग्र वाङ्मय खंड चौथा हिंदुत्व (पुनर्मुद्रण)
ही अकरा पुस्तके दि. २७ फेब्रुवारी, २०१७ रोजीच्या मराठी भाषा गौरव दिन कार्यक्रमात मा.मंत्री महोदय, मराठी भाषा यांच्या उपस्थितीत व मान्यवर साहित्यिकांच्या हस्ते प्रकाशित करण्यात आली.

* अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान -
मंडळाच्यावतीने राबविण्यात येत असलेल्या 'अन्य मराठी साहित्य संमेलनांना अनुदान' या योजनेअंतर्गत सन २०१७-१८ या वित्तीय वर्षात दि. १ मे, २०१७ ते दि. ३१ मे, २०१७ या कालावधीत संस्थांकडून साहित्य संमेलनाच्या अनुदानासाठी अर्ज मागविण्यात येत आहे.

* ई-बुक -
मंडळाच्यावतीने प्रकाशित झालेल्या ४४४ प्रकाशित पुस्तकांपैकी ४२८ पुस्तकांचे ई-बुक पूर्ण झाले असून सदर ई - बुक स्वरूपातील पुस्तके मंडळाच्या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आली आहेत.